ARTHA, Poona 4
Tel. 55627


LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, २१ ऑगस्ट, १९६८ | अंक १६


# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

( हेड ऑफिस : महात्मा गांधी रोड, मुंबई )




## "सेंट्रल" ला

## तुमचे बचत केंद्र करा.

### पुण्यातील कचेऱ्या

महात्मा गांधी रोड–पुणें कँप
*मुख्य कचेरी*

लक्ष्मी रोड,
पुणे शहर

डेक्कन जिमखाना,
पुणे–४

टिळक रोड,
पुणे–९

भवानी पेठ,
पुणे–२

स्वार गेट, पुणे–९.

आमची पुणे कँप मुख्य कचेरी एअर कंडिशण्ड असून सेफ डिपॉझिट व्हॉल्टने सुसज्ज आहे.

टिळक रोड, डेक्कन जिमखाना आणि स्वारगेट कचेऱ्यांतही लॉकर्स उपलब्ध आहेत.

**व्ही. सी. पटेल**
चेअरमन

**एस. आर. टिपणीस**
चीफ एजंट ( पुणे विभाग )

# व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रणे

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., साताराचे. जनरल मॅनेजर श्री. वि. श्री. दामले यांचे सातारा रोटरी क्लबातील भाषण**

आपल्या देशात बँकांविषयीची धोरणे राजकीय विचारावर ठरविली जात आहेत. सामाजिक नियंत्रणाचे धोरण राबविण्याचे काम ज्यांचेवर आहे, त्यांचा या धोरणावर विश्वास नाही. विश्वासाच्या अभावामुळे माझी जबाबदारी कशी टाळली जाईल ह्याच विचारांनी सामाजिक नियंत्रणाची कार्यवाही होत आहे. त्यामुळे सध्या बँकांच्या बाबतीतल्या धोरणविषयक व्यवहारात वैचारिक गोंधळ माजला आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर बँकांनी उद्योगधंद्यांना कर्जे दिली. एकूण कर्जव्यवहारांपैकी ६४% कर्जे उद्योगधंद्यांना दिली, म्हणजे सरकारच्या धोरणाला पोषक असे काम बँकांनी केले. बँकांमध्ये शांततामय क्रांती झाली. शेती व लहान उद्योगधंदे यांना मदत केली नाही, पण आता अशी मदत करण्याची जी वेळ आली आहे ती क्रांतीची दुसरी वेळ आली आहे. मग बँकांना आपणहून हे काम करण्याची संधी दिल्यास तसे घडणार नाही, असे सरकारला वाटते, कारण मोठमोठ्या बँका काही विशिष्ट गटाच्या ताब्यात आहेत; आणि तसा प्रयोग करायला सरकारला पुरेसा वेळ नाही.

शेती व्यवसायाला बँकांनी मदत केली पाहिजे, पण शेतीत गुंतविलेल्या बँकांच्या रकमेची वसुली होईल याची खात्री आहे काय? सहकारी बँका प्रामुख्याने शेतीला कर्जपुरवठा करतात. त्यांचेकडे जमा झालेला पैसा मुख्यत: सरकारकडून आलेला आहे. ह्या बँकांनी शेतीत गुंतविलेल्या पैशाची वसुली व्हावी तशी झाली नाही. आपल्या देशाचा शेती हा मुख्य धंदा आहे. त्याला बँकांनी मदत करणे फार जरुरीचे आहे. पण शेतीतल्या वसुलीबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे.

व्यापारी बँकांचा मुख्य आधार ठेवीदार आहे. ठेवीदारांचे हित पाहिले गेले नाही आणि त्यामध्ये त्यांच्या विश्वासास जरादेखील धोका पोचला तर त्याचे अतिशय प्रतिकूल परिणाम होतील याची पूर्ण जाणीव ठेवली गेली पाहिजे. व्यापारी बँकांविषयीच्या धोरणाबाबत अखेरचे शिक्कामोर्तब करण्यापूर्वी ठेवीदारांच्या हिताचा पूर्ण विचार होणे जरूर आहे. धोरण आखण्यापूर्वी त्यांची अम्मलबजावणी करण्याची अपेक्षा ज्यांचेकडून आहे, त्या बँकांना विश्वासात घेतले जावे.

---

**दोन बायका करण्यास परवानगी**

१९६२ पासून आतापर्यंत भारत सरकारने ४० सरकारी अधिकाऱ्यांना पहिली पत्नी हयात असताही दुसरा विवाह करण्यास परवानगी दिली. १२८ अधिकाऱ्यांनी अशी परवानगी मागितली होती.


तारेचा पता "मॉर्गेज" — मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७ — उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

## मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई


जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५९ कोटी येणे आहेत.

**नी. आ. कल्याणी**
अध्यक्ष

**रा. गो. गोखले** — व्यवस्थापक
**ये. स. बोरगांवकर** — कार्यकारी संचालक



# ☆ अर्थ ☆

बुधवार, २१ ऑगस्ट, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## विकसनशील देशांना आशेचा किरण

संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे प्रसिद्ध होणारा जागतिक आर्थिक परिस्थितीसंबंधीचा १९६७ सालचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. विकसनशील देशांना पुढील वर्ष अधिक चांगले जाणार असल्याचा अभिप्राय अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात लोकसंख्येची वाढ आणि अन्नाचे उत्पादन ह्यांच्या शर्यतीत प्रथमच अन्नधान्याच्या उत्पादनाने आघाडी मारल्याचे नमूद करण्यात आले आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करण्याच्या प्रयत्नात भारत, पाकिस्तान, जपान आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्या देशांना विशेष यश मिळाले आहे. जगातील औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा जो वेग आहे त्याच्या जवळपास सर्व जगातील शेतीचे उत्पादन आलेले आहे. अहवालात जमा करण्यात आलेल्या माहितीवरून असे दिसते की विकसनशील देशांत गेल्या वर्षी भांडवलाच्या संचयाला आणि मालाच्या खपाला चांगली चालना मिळाली. तथापि, एका वर्षाच्या अनुभवावरून आर्थिक विकासाच्या बाबतीत त्यांनी कायमची उभारी घेतली आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. विकसनशील देशांचा आर्थिक गाडा चिखलात रुतल्यासारखा झालेला आहे. ह्या अगतिकतेचे गमक म्हणजे ह्या देशांतील राहाणीमानाचा निकृष्ट दर्जा आणि बचतीची मंद गती. अहवालाच्या वर्षी उपभोग्य वस्तूंच्या खपात वाढ झालेली असली तरी ह्या वस्तूंची परदेशी करण्यात येणारी निर्यात कमी करण्यामुळे हे दृश्य दिसत आहे, हे मुद्दाम सांगण्यात आले आहे. विकसनशील देशांतील औद्योगिक उत्पादनक्षमतेचा काही भाग वापरण्यात आलेला नव्हता. त्याचा वापर झाल्यामुळे भांडवलाच्या संचयात थोडीबहुत सुधारणा झालेली दिसली.

### शेतीच्या उत्पादनातील वाढ महत्त्वाची

ह्या देशांतील अर्थव्यवस्थेत चलनवृद्धीचा दाब मोठ्या प्रमाणावर उत्पन्न झालेला होता. तो काहीसा कमी झालेला आढळून आला. असे असले तरी त्यावरून ठाम स्वरूपाचा काहीही निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. चलनवृद्धीचे दुष्परिणाम काही विवक्षित वस्तूंच्या किंमतीत फार वाढ झाल्यामुळे दिसून येतात. मुख्यत: अन्नपदार्थ आणि त्यांच्या अनुषंगाने लागणारे इतर पदार्थ ह्यांच्या किंमतींवर चलनवृद्धीचा विपरीत परिणाम होत असतो. म्हणून अहवालात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, १९६६ सालाशी तुलना करता १९६७ साली किमती घसरण्याची प्रवृत्ती किमती वाढण्याच्या प्रवृत्तीपेक्षा अधिक वेळा अनुभवास आली. १९६८–६९ साली भारतासारख्या देशात औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग आतापर्यंत सर्वांत अधिक असेल असे अनुमान काढण्यात आले आहे. ह्याचे कारण शेतीच्या मालाच्या उत्पादनात व किमतीत वाढ झाल्यामुळे ग्रामीण भागांत पैसा अधिक प्रमाणात खेळू लागला आहे. ग्रामीण भागांतील लोक हाती आलेल्या पैशाचा उपयोग करून उद्योगधंद्यांत तयार झालेला विविध प्रकारचा माल मोकळेपणाने विकत घेतील अशी अपेक्षा आहे. अर्थातच मालाचा उठाव झटपट झाल्याने औद्योगिक उत्पादनाचा वेग वाढू लागण्यास मदत होईल असा अंदाज आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशात अर्थव्यवस्थेला गती मिळण्यासाठी शेतीचे पीक मुबलक येण्याची आवश्यकता आहेच. तथापि शेती चांगली पिकली म्हणजे सर्व भागले असे म्हणता येणार नाही. कारण, औद्योगिक उत्पादनात वाढ होण्यासाठी औद्योगिक कच्चा माल आणि इतर साधने ह्यांचीही आवश्यकता असते आणि ही सामग्री उपलब्ध होण्यासाठी परदेशी चलनाची गरज असते. परदेशी चलन उपलब्ध असले तरच ह्या मालाची आयात होऊ शकते.

---

## चहाच्या मळ्यातील मजुरांना निवृत्तिवेतन

निवृत्तिवेतनाची कल्पना भारतात अद्यापपर्यंत तरी सरकारी नोकरांपुरतीच मर्यादित राहिलेली आहे. अलीकडे शिक्षकांनाही निवृत्तिवेतन देण्याची भाषा ऐकू येत आहे. परंतु मळ्यावरील मजुरांना निवृत्तिवेतनाच्या कक्षेत येण्यास खूप अवधी लागणार असे वाटते. तथापि आसाममधील टी प्लँटेशन बोर्डाने राज्यातील चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्या कामगारांना निवृत्तिवेतन देण्याची एक योजना आखली आहे. आसाममध्ये ७०८ चहाचे मळे असून त्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या ५ लाख आहे. योजना अशी आहे :—कामगारांच्या वेतनातील १६ टक्के रकम प्रॉव्हिडंट फंडात जमा करण्यात येईल व त्या रकमेवर ३ टक्के दराने व्याज देण्यात येईल. व्याजाच्या खात्यात जमा होणारी रकम निवृत्तिवेतन फंडात वर्ग करण्यात येईल. ह्या फंडातून कामगारांच्या प्रॉव्हिडंट खाती शिल्लक असलेल्या रकमेच्या विशिष्ट टक्केवारीने निवृत्तिवेतन देण्यात येईल.

### बँकेला १६ लक्ष रुपयांना फसविले

आंध्र बँकेच्या बंगलोर शाखेला त्या शाखेच्या एका 'विश्वासू' गिऱ्हाइकाने १६ लक्ष रुपयांना फसविले आहे. बँकेने पोलिसात तक्रार नोंदविली आहे. हा लबाड मनुष्य म्हणजे सावकारीचा धंदा करणारा एक माणूस होता. १९६२ साली त्याने बँकेकडून कर्जे घेण्यास प्रारंभ केला आणि प्रारंभी उत्कृष्ट रीतीने व्यवहार करून त्याने बँकेत विश्वासार्हतेबद्दल मानाने स्थान मिळविले. त्याने पुढे खोटे आणि बनावट दस्त करण्यास प्रारंभ केला, आणि त्यांच्या आधारावर बँकेकडून रकमा घेऊ लागला. त्याच्या फर्मशी, खोट्या नावाखाली केलेल्या मोटारींच्या हायर परचेस करारांच्या पोटी त्याने बँकेकडून कर्जे घेतली. एप्रिल १९६७ पर्यंत कर्जफेडीचे हप्ते वक्तशीर दिले गेले, परंतु पुढे ते थकू लागले. त्याने बँकेकडे खोट्या किल्ल्याही ठेऊन दिलेल्या होत्या. त्याने खोट्या हुंड्याही डिस्कौंट करून घेतल्या होत्या. खोटी रजिस्ट्रेशन सर्टिफिकिटे बँकेकडे देण्यात आली होती. ह्या आरोपीने प्रथम हायर परचेसच्या कराराने घेतलेल्या लॉरीसाठी बँकेकडून २१,००० रु. काढले. अशा आणखी कित्येक रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटांवर त्याने बँकेकडून १० लक्ष रु. मिळविले. खोट्या हुंड्यांवर ६ लक्ष रु. मिळविले. एका मोटार कंपनीच्या व्यवहारात ह्या आरोपीचा खोटेपणा उघडकीस येऊन तिने पोलिसात तक्रार केली. तेव्हा बँकही जागी झाली.

### निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा वाढणार

लोकसभा आणि विधान सभा ह्यांच्या निवडणुकीसाठी उमेदवाराने करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा वाढविण्यात येणार आहे. लोकसभेच्या जागेसाठी सध्या ती २५,००० रु. (नागालँड : १०,००० रु) आहे; ती ३५,००० रु. (नागालंड : १२,५०० रु.) करण्यात येईल. विधान सभेच्या जागेसाठी कमाल मर्यादा राज्यवार वेगवेगळ्या आहेत.

### बी. बी. सी. प्रमुखाची हिंदीमधून मुलाखत


ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनचे नवे डायरेक्टर जनरल, मि. चार्लस करन, ह्यांची बी. बी. सी. च्या हिंदी विभागात मुलाखत प्रक्षेपित करण्यात आली, तेव्हा त्यांनी सर्व उत्तरे अस्खलित हिंदीमधूनच दिली. दुसऱ्या महायुद्धकाळात ते भारतामध्ये काही वर्षे होते.

### बिहारमध्ये चीनने छापलेल्या खोट्या हिंदी नोटा ?

चीनमध्ये छापलेल्या खोट्या हिंदी चलनी नोटा बिहारमध्ये प्रसारात आहेत, ह्या बातमीबद्दल कसून चौकशी करण्यास भारत सरकारने बिहार सरकारला सांगितले आहे.

### पिलाई बँकेचे लिक्विडेशन डिव्हिडंड

पिलाई बँकेच्या उरलेल्या जिंदगीतून लिक्विडेटरने चालू वर्षी डिव्हिडंड देण्याइतकी वसुली झालेली नाही.

### राजस्तानची पाणीपुरवठ्याची योजना

राजस्तानमधील पश्चिमेकडील भाग रेताड व रूक्ष आहे. पाण्याअभावी ह्या जमिनीत कोणतीही पिके घेता येत नाहीत. पिके घेण्याचे बाजूला राहिले; पण ह्या भागातील कित्येक खेड्यांतील लोकांना उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. ही परिस्थिती पाकिस्तानला लागून असलेल्या राजस्तानच्या गंगासागर, बिकानेर आणि जेसलमीर ह्या जिल्ह्यांतून विशेष प्रकर्षाने जाणवते. प्रदेश ओसाड असल्यामुळे पाकिस्तानमधील भुरटे लोक मधून मधून आक्रमण करीत असतात. चोरटा व्यापारही चालूच असतो. राजस्तान सरकारने ह्या भागाला पाणी पुरविण्याची एक मोठी योजना आखली असून तिच्या कामाला प्रारंभही झाला आहे. पंजाबमधील हरिके ह्या गावापासून रावी व बिआस नदीचे कालवे काढून राजस्तानात पाणी आणण्यात आले आहे. ह्याच कालव्यातून पाणी उपसून ते१०२ मैल लांबीच्या नव्या कालव्याने राजस्तानच्या पश्चिमेकडील भागाला पुरविण्यात येणार आहे. नव्या कालव्यामुळे सुमारे एक लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. कालवा पुरा झाल्यावर ७० खेड्यांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासणार नाही. राजस्तानमधील तृषार्त जमिनीला पाणीपुरवठा करण्याची ही एक प्रचंड योजना असून ती पुरी करण्यासाठी ७ कोटी रुपये खर्च येणार आहे. पाणी उपसून शेतीसाठी देण्याची ही योजना जगातील सर्वांत मोठी आहे असे सांगण्यात येत आहे. राजस्तानमधील पाकिस्तानला लागून असलेल्या भागात लोकवस्ती विरळ आहे. पाण्याचा पुरवठा होऊ लागल्यावर तेथील वस्तीही वाढण्याची शक्यता उत्पन्न होईल आणि वस्ती वाढल्यावर भुरट्या पाकिस्तान्यांपासून लोकांचे संरक्षण अधिक चांगल्या प्रकाराने करता येईल. ही सर्व योजना हिंदी एंजिनिअरांच्या मार्फतच पूर्ण करण्यात येणार आहे.

---

### बोरिवलीजवळ राष्ट्रीय उद्यानाची स्थापना

महाराष्ट्र सरकारने मुंबईजवळ बोरिवली येथे एका राष्ट्रीय उद्यानाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. आरे गौळवाड्याला लागूनच होणाऱ्या ह्या उद्यानाचा विस्तार ५६ चौरस किलोमीटर असणार आहे. बोरिवली हे उपनगर मुंबईपासून अवघ्या १९ मैलांवर आहे. तेथे जाण्यास रेल्वेने प्रवास केला तर सुमारे पाऊण तास लागतो. सध्या बोरिवली स्टेशनपासून एक मैलावर असलेले उद्यान १९४९ साली स्थापन करण्यात आले असून त्याचा विस्तार अवघा पाच हजार एकर आहे. उद्यानात अनेक रमणीय ठिकाणे आहेत. मुंबापुरीच्या धावपट्टीला कंटाळलेले अनेक लोक ह्या उद्यानात आठवड्याचा शीण घालविण्यासाठी जात असतात. तथापि, नव्याने स्थापन करण्यात यावयाच्या राष्ट्रीय उद्यानाची आकर्षकता खूपच अधिक होणार आहे. नव्या उद्यानात मुलांच्या मनोरंजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नौकाविहाराची सोयही करण्यात येणार आहे. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी खास निवासस्थाने उभारण्यात यावयाची आहेत. एक खुले नाट्यगृह उभारण्यात येणार आहे. इतक्या सोयी करण्यात आल्यावर एक प्राणीसंग्रहालय आणि एक वनस्पती उद्यान हेही आलेच. उद्यानाचा असा विकास झाल्यावर मुंबईमधील प्रेक्षणीय स्थळांत एक चांगली भर पडणार आहे. पण राष्ट्रीय उद्यान बघण्यासाठी येणारे प्रवासी बोरिवलीच्या आसपासची इतर प्रेक्षणीय स्थळेही सहज पाहू शकतील. त्यांना आरे येथील गौळवाडा तर पाहाता येईलच. त्याशिवाय कान्हेरी येथील बुद्धकालीन लेणीही पाहाता येईल. सध्या ही लेणी पाहाण्यासाठी फारसे लोक येत नाहीत. राष्ट्रीय उद्यानाचा पूर्ण विकास झाल्यावर प्रवाशांचे लक्ष लेण्यांकडेही अधिक जाऊ लागण्याची शक्यता आहे. कान्हेरीमधील लेणीत १०० गुंफा आहेत.

---

### आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांना पकडण्यासाठी जगभर पाळत

अमेरिकेतील निग्रो समाजाचे धुरीण मि. मार्टिन ल्यूथर किंग ह्यांचा खून झाला. गुन्हेगार अर्थातच तावडतोब सापडला नाही. पाश्चात्त्य देशातील गुन्हेगार चलाख आणि गुन्हा करण्यातसुद्धा आधुनिक तंत्र वापरणारे असतात. म्हणूनच त्यांना पकडणे अवघड जाते; त्याचबरोबर गुन्हेगारांना हमखास पकडणाऱ्या गुप्तपोलिसांच्या चातुर्यकथांनाही भरपूर वाव मिळतो. पुष्कळदा गुन्हेगार परदेशात पळून जातात. भारतात चोरट्या सोन्याची आयात करणारा वॉलकॉट प्रसिद्धच आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांना पकडण्याचे प्रयत्न करणारी आंतरराष्ट्रीय पोलिससंघटना असून निरनिराळ्या देशांतील पोलिसखाती ह्या बाबतीत सहकार्य करीत असतात. डॉ. मार्टिन किंग ह्यांचा खून झाल्यावर सर्व जगभर विमानतळांवरील व बंदरांवरील पोलिसांना पाळत ठेवण्याचे आदेश मिळाले होते. त्याप्रमाणे भारतामधील गुप्तपोलिसांनी सर्व बंदरांवर व विमानतळांवर काकदृष्टी ठेवली होती. जगातील सर्वांत धोकादायक गुन्हेगारांबाबतही अशीच दक्षता घेण्यात येत असते. हिंदी गुप्तपोलिसांना त्यांची माहिती देण्यात येत असून त्याप्रमाणे ते अगदी बारीक पाळत ठेवत असतात. ह्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांपैकी कित्येक गुन्हेगार काही देशांना खटला भरण्यासाठी हवे असतात. बऱ्याच विमानतळांवर अशा गुन्हेगारांना येणेसुद्धा शक्य असते. विमानतळावर ते दिसल्याबरोबर त्यांना तावडतोब अटक करण्याचे हुकूम दिलेले असतात. काही गुन्हेगारांवर नुसतीच पाळत ठेवण्यात येत असते व त्यांच्या हालचालींची माहिती निरनिराळ्या सरकारांना पुरविण्यात येते. ह्या माहितीचा उपयोग करून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीचे जाळे उजेडात आणण्याचे प्रयत्न होत असतात. हा हेतू गुन्हेगारांना पकडून साध्य होतोच, असे नाही.

**काम करणाऱ्या माणसांत एकतृतीयांश स्त्रिया**

जिनीव्हामधील आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने जगातील काम करणाऱ्या माणसांसंबंधी एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात दिलेल्या माहितीप्रमाणे उत्पादक व तदनुषंगिक कामात राबणाऱ्या एकूण लोकांपैकी एकतृतीयांश संख्या स्त्रियांची आहे. तथापि निरनिराळ्या देशांत हे प्रमाण वेगवेगळे आहे. रशिआ आणि पूर्व युरोपमधील देश ह्यांमधून सामाजिक व आर्थिक विकास घडून येत आहे. त्याचबरोबर कुटुंबसंस्थेचे स्वरूपही पालटत आहे. त्यामुळे स्त्रियांना नवनव्या संधी प्राप्त होत आहेत. परिणामी ह्या देशातील काम करणाऱ्या लोकांत स्त्रियांचे प्रमाण ४० टक्क्यांइतके झाले आहे. पश्चिम युरोप व उत्तर अमेरिका ह्या भागांत हे प्रमाण एकतृतीयांश इतकेच आहे. फ्रान्समध्ये मात्र काहीशी निराळी परिस्थिती दिसून येते. त्या देशात घराबाहेर कामासाठी जाणाऱ्या स्त्रियांची संख्या गेल्या १० वर्षांत काहीशी स्थिर राहिलेली दिसते. ही संख्या सुमारे ६० लाख इतकी होती. परंतु अलीकडे परिस्थिती पालटू लागली आहे. फ्रान्समध्ये अधिकाधिक स्त्रिया शेतांवरील कामे सोडून शहरांत येऊ लागल्या आहेत. ह्या बाबतीत भारतामधील परिस्थितीशी तुलना करणे मनोरंजक ठरेल. भारतामधील शहरांतून काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुमारे ३ कोटी इतकी आहे. पण, त्यामधील २० टक्के काय त्या स्त्रिया आहेत. ग्रामीण भागांत शेतीची कामे करणाऱ्या स्त्रिया व पुरुष आहेत. परंतु स्त्रियांना शेतीची कामे करून शिवाय घरातील कामेही करावी लागतात आणि तरीसुद्धा शेतावर राबणाऱ्या लोकांत स्त्रियांची टक्केवारी ३३ टक्क्यांइतकी आहे. शेतीच्या व्यवसायात अलीकडे बरेच नवे उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. त्याचा परिणाम म्हणून शेतांवरील स्त्रियांची संख्या वाढण्याचा संभव आहे.

---

**मच्छीमारीच्या धंद्याच्या विकासाची योजना**

केरळ सरकारने मच्छीमारीच्या धंद्याचा विकास घडवून आणणारी एक फार मोठी योजना तयार केली आहे. ह्या योजनेसाठी २० कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. योजना पाच टप्प्यांत पूर्ण करण्यात यावयाची आहे. मच्छीमारीसाठी खास बंदरे बांधणे आणि कोळ्यांना भरपूर सवलती देणे ह्यांचा योजनेत समावेश आहे. मध्यवर्ती सरकारकडून भरपूर मदत मिळाल्यासच ती अमलात आणणे शक्य होणार आहे. मच्छीमारी करण्यासाठी बनविण्यात आलेल्या ६ परदेशी बोटी आयात करण्यात येणार असून आणखी ६ तशाच बोटी देशातच बनविण्यात येणार आहेत. नव्या बोटीच्या साह्याने धंदा सुरू झाल्यावर त्यात महत्त्वाचे व क्रांतिकारक बदल होतील.


दातांच्या स्वच्छतेसाठी

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

## जगातील तिसऱ्या क्रमांकाचा श्रीमंत देश जपान

गेल्या महायुद्धात झालेल्या अपरंपार नाशातून डोके वर काढण्याचे काम जपानने विलक्षण गतीने पार पाडले आहे. जपानच्या अर्थव्यवस्थेची वाढ वेगाने होत आहे, गेल्या वर्षी वाढीची गती १३ टक्के होती. आता लवकरच जपान प्रगत देशांच्या उत्पादनापेक्षा अधिक उत्पादन करू लागेल. फक्त अमेरिका आणि रशिआ हे दोनच देश ह्या बाबतीत जपानच्या पुढे असतील. ह्याचा अर्थ, जपान हा देश श्रीमंतीच्या बाबतीत जगात तिसरा क्रमांक पटकावील. अर्थात दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर ब्रिटन अगर जर्मनी ह्या देशांची बरोबरी करण्यास जपानला अद्याप काही वर्षे लागतील. पण, जपानची लोकसंख्या जवळजवळ १० कोटी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. हिंद आणि चीन ह्या देशांचे राष्ट्रीय उत्पन्न जपानच्या मानाने बरेच अधिक असले तरी त्यांचे दरडोई उत्पन्न बेताचेच आहे. लोकसंख्याच मोठी असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न मोठे आहे. लोकसंख्येच्या बाबतीत पाकिस्तान आणि इंडोनेशिआ हे देश जपानच्याच जवळपास आहेत. परंतु त्यांचे उत्पादन जपानच्या मानाने कितीतरी खालच्या पातळीवर आहे. पश्चिम युरोपातील राहणीमान गाठू शकणारा जपान हा आशिआतील एकमेव देश आहे. मोठ्या प्रमाणावर व्यापार करणाऱ्या देशांत जपानचा ६ वा क्रमांक लागतो. ह्याचाच अर्थ असा की युरोपातील देशांशी जपान व्यापारी स्पर्धा करू शकतो. जहाजे बांधण्याच्या धंद्यात जपानचा पहिला नंबर आहे, आणि मोटारी तयार करण्याच्या बाबतीत दुसरा नंबर आहे. जपानच्या आर्थिक नियोजन संघटनेने अलीकडे एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे. तीत जपानच्या आर्थिक विकासाच्या दिशेचा आढावा घेण्यात आला असून त्यातील काही कमजोर स्थळेही दाखविलेली आहेत.

## जगातील औषधी वनस्पतींची पाहणी

बडोदा येथील सयाजीराव विद्यापीठाने गुजरात राज्यातील जंगलात वाढणाऱ्या औषधी वनस्पतींची पाहणी करण्याचा एक पंचवार्षिक कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे. ह्या संशोधन-कार्यासाठी अमेरिकेच्या सरकारने २ लाख, २७ हजार रुपयांची मदत देण्याचे कबूल केले आहे. जंगलातून आदिवासी रहिवाशांची वस्ती असते. हे लोक जंगली वनस्पतींचा अन्नासाठी व औषधासाठी उपयोग करीत असतात. ते अशा वनस्पतींचा कसा उपयोग करतात ह्याचाही मुद्दाम अभ्यास करण्यात येणार आहे. विद्यापीठाचे वनस्पतिविभागाचे प्रमुख पाहणीच्या कामाचे नेतृत्व करणार आहेत. ज्या वनस्पतीपासून टॅनिक ॲसिड मिळू शकते त्यांचा विशेष शोध करण्यात येणार आहे. टॅनिक ॲसिड अनेक औषधांसाठी लागते. टॅनिक ॲसिड असणाऱ्या वनस्पतींच्या शोधामुळे राज्याचा आर्थिक फायदा होईल.

## वेश्याव्यवसायाचे आकर्षण : मुंबईमधील पाहणी

टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसच्या संशोधन खात्याचे प्रमुख, डॉ. एस. डी. पुणेकर आणि कु. कमला राव ह्यांनी मुंबईमधील कामाठीपुऱ्यातील एकूण सुमारे ५,००० वेश्यांपैकी ४२५ वेश्यांची पाहणी करून 'ए स्टडी ऑफ प्रॉस्टिटयूट्स इन बाँबे' ह्या नावाने त्याचा निष्कर्ष प्रसिद्ध केला आहे. ह्या वेश्यांपैकी ८६ वेश्या हिंदू आहेत आणि त्यापैकी निम्म्या हरिजन आहेत. बहुतेक सर्व वेश्यांचे मूळ स्थान विजापूर, दक्षिण कानडा आणि बेळगाव जिल्हा, हे आहे. ज्यांची मुलाखत घेतली, अशा वेश्यांपैकी एक तृतीयांश वेश्या यल्लम्मा देवीला वाहिलेल्या देवदासी होत्या. एकूण वेश्यांपैकी १०% वेश्यांना लिहितावाचता येत होते. बहुतेकांनी ह्या व्यवसायात प्रवेश केला, त्याचे कारण त्याचे आकर्षण हेच असावे; विवेकाने घेतलेला तो निर्णय नव्हता. बहुसंख्य वेश्यांची मासिक प्राप्ती ५१ ते १०० रु. होती. ३६% वेश्यांनी त्यांना गुप्तरोग असल्याचे कबूल केले. ह्याचा अर्थ, गुप्तरोगाने पछाडलेल्यांची संख्या त्यांपेक्षा जास्तच असणार. बहुसंख्य वेश्यांचे जीवन समाधानकारक नसूनही १०% पेक्षाही कमी वेश्या हे जीवन टाकून सन्माननीय नोकरी करण्यास तयार आहेत!

## अभ्रकाच्या खाणधंद्याला धोका

भारतात अभ्रकाच्या खाणी सुमारे ६०० पर्यंत आहेत. अभ्रक हा खनिज पदार्थ फक्त भारतातच मोठ्या प्रमाणावर सापडतो. त्यामुळे त्याच्या पुरवठ्याची मक्तेदारीच भारताकडे आहे. परंतु आता ह्या खनिजाला एका कृत्रिम रीतीने बनविलेल्या अभ्रकाशी स्पर्धा करावी लागणार आहे. रशिआमधील मॉस्को शहरात कृत्रिम खनिज तयार करणारी एक संस्था आहे. तिने कृत्रिम अभ्रक तयार करण्यात यश मिळविले आहे. हे अभ्रक पूर्णपणे पारदर्शक असून लवचीकही आहे. शिवाय १,१०० अंश तपमानालाही ते दाद देत नाही. उलटपक्षी, नैसर्गिक अभ्रक ४०० अंशांपेक्षा अधिक तपमान सहन करू शकत नाही. रेडिओत वापरण्यात येणारे काही भाग कृत्रिम अभ्रकाचे केले तर ते अधिक टिकाऊ होतात असा दावा करण्यात येत आहे.

## अपत्यांची संख्या रोखण्याची म्हैसूरची योजना

जे पालक आपल्या अपत्यांची संख्या तिनावर किंवा ५ जून १९६८ रोजी असणाऱ्या संख्येवर मर्यादित करणार नाहीत, अशांच्या मुलामुलींना शैक्षणिक सवलती, नादाऱ्या, शिष्यवृत्त्या, इत्यादी मिळणार नाहीत किंवा चालू राहणार नाहीत, असा म्हैसूर सरकारने हुकूम काढला आहे.

## गुजरातमधील पुराच्या वेळी विमानातून वाहतूक

गुजरातमधील पुराच्या वेळी इंडियन एअरलाइन्सनी १२,००० उतारूंची विमानातून वाहतूक केली.

## औषधे तयार करण्याच्या धंद्यांत वाढ

भारत सरकारच्या ड्रग डेव्हलपमेंट कौन्सिलचे अध्यक्ष श्री. ए. व्ही. मोदी ह्यांनी आंध्र प्रदेशाच्या अॅकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस ह्या संघटनेपुढे भाषण करताना औषधाच्या धंद्याचा वाढता पसारा आणि त्याचे महत्त्व ह्याबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की औषधांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याबद्दल इषारा देणे अगत्याचे आहे. कारण, भारताला सर्वकाळ औषधांच्या आयातीवर अवलंबून राहणे परवडणार नाही. युद्धाचा भडका केव्हा उडेल अगर परदेशीय मदत केव्हा थांबेल ते सांगता येण्यासारखे नाही. देशाची लोकसंख्या वाढत आहे आणि वैद्यकीय व्यवसायाचे सामाजीकरण होण्याचाही संभव आहे. अशा परिस्थितीत औषधांची मागणी सारखी वाढत जाणार आहे हे स्पष्ट आहे. गेल्या तीसचाळीस वर्षांत औषधे तयार करण्याचा धंदा चांगलाच फोफावला आहे. १९४७ साली देशात १० कोटी रुपयांची औषधे तयार करण्यात आली तर १९६७ साली १७५ कोटी रुपयांची औषधे तयार करण्यात आली. ह्यावरून प्रगतीची कल्पना येते. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सुमारे २५० कोटी रुपयांची औषधे तयार करण्यात येतील असा अंदाज आहे. नवीन औषधे शोधून काढण्यात बुद्धी, चिकाटी आणि अखेर नशीब ह्याचा भाग असतो. एखादे नवीन औषध शोधून काढण्यात आले तरी ते माणसाला तावडतोब देता येत नाही. कारण, तसा वापर करण्याच्या बाबतीत काही नियम ठरविण्यात आलेले आहेत. त्यांचे उल्लंघन करता येत नाही. प्रथम नवीन निघालेली औषधे दोनतीन वर्षे प्राण्यांवर वापरून पाहावी लागतात आणि यशस्वी ठरल्यावर माणसांसाठी वापरली जातात.

---

## स्वयंपाकासाठी गॅसचा वाढता उपयोग

मोठ्या शहरांत गेल्या काही वर्षांत स्वयंपाकासाठी गॅसचा उपयोग करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सध्या तीन परदेशीय कंपन्या गॅसचा पुरवठा करीत असतात. इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनही ह्या व्यवसायात उतरले असून काही शहरांत त्याच्यातर्फे पुरवठा होत आहे. तथापि कॉर्पोरेशनतर्फे होणारा पुरवठा वाढविण्याच्या कामी काही अडचणी आहेत. त्या शक्य तितक्या दूर करून येत्या पाच वर्षांत बहुतेक शहरांना गॅसचे जळण पुरविण्याचा प्रयत्न कॉर्पोरेशन करणार आहे. पुरवठा करण्यासाठी गॅस द्रव स्थितीत ज्या टाक्यांतून भरावा लागतो त्यांची सध्या टंचाई आहे. म्हणून हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याकडे अशा ६ लाख टाक्या तयार करण्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. त्याशिवाय काही छोट्या कारखानदारांकडे १॥ लाख टाक्यांची मागणी नोंदविण्यात आली आहे. आणखीही काही कारखान्यांकडे टाक्यांच्या मागण्या नोंदविण्यात आल्या आहेत. स्वयंपाकासाठी गॅसच्या जळणाचा प्रसार झाल्यास त्याचे अनेक फायदे स्वयंपाकघराबाहेरही मिळणार आहेत. सध्या शहरांतून गॅस उपलब्ध नसेल तर कोळसा वापरण्यात येतो. खेडेगावांत तर सरपणासाठी लाकडे आणि गोवऱ्या ह्यांचा उपयोग सरसहा करण्यात येतो. उत्तर हिंदुस्थानातील मोठ्या शहरांतून दगडी कोळसा वापरला जातो. खेडेगावांत लाकडे जाळण्यात येत असल्यामुळे जंगलातील वृक्षांची अनिर्बंध तोड होत आहे. त्याचा परिणाम जमिनीची धूप होण्यात व पर्जन्यमान घटण्यात होत आहे. दगडी कोळशापासून अनेक प्रकारचे रासायनिक पदार्थ तयार होऊ शकतात. जळणासाठी गॅसचा उपयोग सर्वत्र होऊ लागल्यास ग्रामीण भागातील नैसर्गिक संपत्ती अधिक काळ टिकेल आणि तेथील जीवन अधिक सुखाचे होईल.

---

## पैसा उभारण्यासाठी सरकारी सोडत

राजस्थान सरकारने विकासाच्या कामासाठी लागणारा पैसा उभारण्याचे एक साधन म्हणून सोडतीचा उपक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे. सोडतीचा प्रारंभ सप्टेंबरपासून होईल. सोडतीची रक्कम १ कोटी रुपयांची आहे. प्रत्येकी २ रुपयांची ५० लाख तिकिटे काढण्यात घेणार आहेत. तिकिटांचा नमुना नक्की करण्यात आल्यावर सरकारी छापखान्यात तिकिटे छापण्यात येतील. पहिले बक्षिस १ लाख रुपयांचे ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर ५० हजारांची दोन, २५ हजारांची चार, आणि एक हजार रुपयांची १०० अशी बक्षिसे ठेवण्यात येणार आहेत. बक्षिसांच्या चिठ्ठ्या प्रथम टाकण्यात येतील, त्या वेळेचे उत्पन्न पिण्याच्या पाण्याच्या योजनांवर व ग्रामीण भागातील विद्युत् पुरवठ्यावर खर्च करण्यात यावयाचे आहे. सोडतीची तिकिटे सर्व देशभर विक्रीसाठी पाठविण्यात येणार असून ती खपविणाऱ्या एजंटांना प्रलोभन म्हणून आकर्षक दराने कमिशन देण्यात येणार आहे. ५ हजार तिकिटे खपविणाऱ्या एजंटाला १२·५ टक्के कमिशन देण्यात येईल. त्यापेक्षा अधिक तिकिटे खपविणाऱ्या एजंटाला १५ टक्के कमिशन देण्यात येईल. एजंटांनी एकमेकाशी स्पर्धा करून जास्तीत जास्त तिकिटे खपवावी म्हणून काही रोख बक्षिसेही ठेवण्यात येणार आहेत. ५ हजारांपेक्षा अधिक तिकिटे खपविणाऱ्या एजटांना १० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. सोडतीच्या तिकिट विक्रीची एजन्सी कोणालाही घेता येईल. फक्त राजपत्रित सरकारी नौकर आणि पोलिस अधिकारी ह्यांना मात्र एजन्सी मिळणार नाही. मध्यवर्ती सरकारच्या बक्षिस रोख्यांचे सुदैवी नंबर ज्या पद्धतीने काढण्यात आले त्याचप्रमाणे सोडतीचेही नंबर काढण्यात येतील. ह्या कामासाठी पाच सदस्यांची एक कमिटी स्थापन करण्यात येईल.

**सीलोनमध्ये गांधी स्मारक संस्था**—सीलोनमध्ये महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगाने एक स्मारकसंस्था उभारण्यात येणार आहे. संस्थेच्या इमारतीसाठी पैसा गोळा करण्याचे काम सुरू झाले आहे. इमारतीत एक सभागृह आणि वाचनालय ह्यांची सोय करण्यात येईल. त्याशिवाय १०० खेड्यांचा विकास करण्याची एक योजनाही आखण्यात आली आहे.

**एम. पी. ना अधिक भत्ता व सुखसोई**—लोकसभेच्या २१ सभासदांच्या समितीने लोकसभेच्या सदस्यांना अधिक सुखसोयी मिळाव्यात, ह्या दृष्टीने सूचना केल्या आहेत. त्यांचा रोजचा भत्ता ३१ रु. चा ५१ रु. करावा; सात दिवस गैरहजेरी असली तरी त्या दिवसांचा भत्ता मिळावा, प्रत्येकाला १०० रु. स्टेनोग्राफर भत्ता मिळावा, वातानुकूल खोलीचा 'अ' वर्गाचा फ्लॅट राहण्यास मिळावा, व वीज-पाण्यासाठी दरसाल ६०० रु. मिळावे, मोफत पासेसमध्ये विमानाचा प्रवास अंतर्भूत असावा, इत्यादी शिफारसी कमिटीने केल्या आहेत.

**विज्ञानशाला बंद होणार**—मद्रास राज्य सरकारने राज्यातील विज्ञानशाला बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागांतील लोकांना शास्त्रीय ज्ञान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्यांची स्थापना करण्यात पं. नेहरूंनी पुढाकार घेतला होता. १९५५ पासून त्यांचे कार्य सुरू झाले होते. परंतु शालांतर्फे होणारे कार्य मद्रास सरकारला मोलाचे वाटत नाही. म्हणून त्या बंद करण्याचे ठरविण्यात आले आहे.

**डीमरेज भरणे किफायतशीर**—माल आयात करणारांना मुंबईत स्वस्त दराचे गोडाऊन मिळणे कठीण जाते. त्यामुळे ते आलेला माल बंदरातील छपराखाली राहू देतात. त्याप्रीत्यर्थ येणारा डीमरेजचा खर्च त्यांना परवडतो. मुंबई बंदराला त्यांनी गेल्या वर्षी अशा रीतीने ४.५ कोटी रु. डीमरेज चार्जेस भरले. त्या खालोखाल कलकत्ता बंदराने २.१७ कोटी रु. आणि मद्रास बंदराने १.०४ कोटी रु. मिळविले.






## लॉर्ड रे औद्योगिक संग्रहालयाचे रूपांतर व नामांतर

### महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे.

गेली ३८ वर्षे लॉर्ड रे औद्योगिक संग्रहालय या नावाने सर्वांना सुपरिचित असलेल्या पुणे येथील संग्रहालयाचे ध्येय व उद्दिष्टे ह्यात वाढ करण्याचे व संग्रहालयाचे विश्वस्त मंडळ विस्तृत व व्यापक प्रतिनिधित्व असलेले करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे. या दृष्टीने महाराष्ट्र विधान सभा व विधान परिषद् यांनी संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्राध्यक्षांची मान्यता मिळाली असून शासकीय निर्णयनुसार हे विधेयक स्वातंत्र्यदिनाच्या सुमुहूर्तावर, १५ ऑगस्ट १९६८ पासून अमलात आले आहे. या विधेयकान्वये हे संग्रहालय यापुढे "महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे" या नावाने ओळखले जाईल.

सध्याच्या संग्रहालयास नवीन विभागांची जोड तावडतोब देता यावी म्हणून संग्रहालयाच्या इमारतीत वाढ करण्याच्या दृष्टीने आराखडे तयार करण्यात आले आहेत. आणखी सहा हॉल्स बांधण्याची आवश्यकता असून त्यासाठी सुमारे चार लक्ष रुपये खर्च येणार आहे.

संग्रहालयाच्या नवीन बहुउद्देशीय स्वरूपामुळे संग्रहालयाच्या व्याख्याने, चित्रपटदर्शन, प्रदर्शने व शैक्षणिक कार्यक्रमांत विविधता येऊन ते अधिक उपयुक्त व उद्बोधक होतील व संग्रहालयाचा फायदा सध्यापेक्षा अधिकच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांना घेता येईल.

संग्रहालयाचे सध्याचे क्यूरेटर श्री. गोविंदराव सरदेसाई यांचीच नवीन संग्रहालयाचे पहिले संचालक (डायरेक्टर) म्हणून नियुक्ती झाली आहे.

---

### पंजाबातील गव्हाच्या उत्पादनाचा उच्चांक

रबी हंगामाच्या पिकांत पंजाबने गव्हाच्या बाबतीत उच्चांक गाठला आहे. दर एकरी सरासरी १९ मण पीक काढण्यात पंजाबमध्ये यश मिळाले आहे. अखिल भारतामधील गव्हाच्या पिकाची दर एकरी सरासरी अवघी ९ मण आहे. अधिक पीक देणाऱ्या गव्हाच बियाणे वापरण्यात आल्यामुळे राज्यातील एकूण पिकात एकदम खूप वाढ झालेली आहे. गव्हाचे एकूण उत्पादन ३३ लाख टनांपर्यंत वाढले आहे. गेल्या वर्षीच्या रबी हंगामात २४·४५ लाख टन पीक आले होते. १९६१ मध्ये लुधियाना व इतर ४ जिल्ह्यांत सधन शेतीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. लुधियाना जिल्ह्यात गेल्या वर्षी दर एकरी २८ मण गहू पिकविण्यात आला होता. ह्या हंगामात दर एकरी गव्हाच्या पिकाची सरासरी ३६ मण पडली.

अर्थ (पाक्षिक)
महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह
"दुर्गाधिवास" पुणे ४.




पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.